


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २९२, गुरुवार ८ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विजय औटीचा उच्च न्यायालयानेही जामीन फेटाळला

## ■ कोठडीतील मुक्काम वाढला ■ सिव्हील रूग्णालयातील बडदास्तही चव्हाट्यावर

औरंगाबाद : प्रतिनिधी

**अॅड. राहुल झावरे यांच्यावर खुनी हल्ला केल्याप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेला पारनेरचा मा. नगराध्यक्ष विजय औटी याच्यासह इतर दोघांची जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने बुधवारी फेटाळून लावले. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे विजय औटी, प्रितेश पानमंद व मंगेश कावरे यांचा कोठडीतील मुक्काम वाढला आहे. दरम्यान, सिव्हील रूग्णालयात उपचाराच्या नावाखाली दखल केलेल्या विजय औटी याच्या शाही बडदास्तीचाही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पर्दाफाश केल्याने औटी याच्या अडचणींमध्ये अधिक वाढ झाली आहे.**

विजय औटी, प्रितेश पानमंद तसेच मंगेश कावरे यांचे जामीन अर्ज नगरच्या न्यायालयाने फेटाळल्यानंतर औरंगाबाद खंडपीठात तिघांच्या वतीने जमीन अर्ज दाखल करण्यात आले होते. बुधवारी त्यावर सुनावणी झाली. आरोपींच्या वकीलांनी जामीन अर्ज मांडल्यानंतर फिर्यादीचे वकील राहुल करपे यांनी त्यास आक्षेप घेतला. अॅड. करपे यांनी पोलीसांनी सादर केलेला व्हिडीओ जप्त पंचनामा वाचून दाखविला. ही घटना आंबेडकर चौकात घडली असून व्हिडीओ क्रॉप करून सादर करण्यात आल्याचे ते म्हणाले. फ्लॅट तसेच शॉपची बनावट दस्तऐवज तयार करून नगरपंचायत दप्तरी नोंद केल्याप्रकरणी दाखल गुन्हा, शासकीय कर्मचाऱ्याला मारहाण तसेच लोकसभा निवडणूकीपूर्वी दाखल झालेल्या गुन्हयाचा संदर्भ देत अॅड. करपे यांनी औटी याची पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरूपाची असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. औषधोपचाराच्या नावाखाली रूग्णालयात दाखल होउन मला औषधोपचाराची गरज नाही हे आरोपी औटी याने स्वतः लिहून दिले आहे. यावरून हा आरोपी अहंकारी असून प्रशासनास त्रास देणे, दडपशाही करण्याचा तो प्रयत्न करत असल्याचे अॅड. करपे यांनी सांगितले. त्यानंतर औटी याच्या वकीलांनी जामीन अर्ज मागे घेतला व न्यायालयाने जामीन फेटाळून लावला.

दरम्यान, पोटदुखीचे कारण करून शुक्रवार दि.२ ऑगस्ट रोजी आगोदर पारनेरचे ग्रामीण रूग्णालय व तेथून नगरच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलेल्या विजय औटी याची हॉस्पिटलध्ये शाही बडदास्त ठेवली जात असल्याचा पर्दाफाश महाविकास आघाडीच्या कार्यकत्यांनी बुधवारी रात्री केला. काँग्रेसचे शहराध्यक्ष किरण काळे, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे व कार्यकर्त्यांनी रूग्णालयात ठिय्या आंदोलन केल्यानंतर रात्री ८ वाजून १३ मिनिटांनी औटी यास तेथून पारनेर येथे हालविण्यात आले असे काळे यांनी सांगितले.



■ विजय औटी यास सिव्हिल हॉस्पिटल मध्ये दाखल केल्यानंतरचे सीसीटिव्ही फुटेज मिळावे या मागणीसाठी महविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या दालनात ठिय्या दिला.

### आम्ही सोडले, आरोपी गेला नाही !

आम्ही औटी यास सकाळीच सोडले होते. परंतू तो रूग्णालयातून गेला नाही. रूग्णालयात जाऊन पाहणी केली असता त्याची पोटाची तक्रार असल्याचे कागदोपत्री नोंद होती. त्याला आरोपींच्या वॉर्डात न ठेवता आर्थो विभागात भरती करण्यात आले होते. आपण कुठल्याही प्रकारची औषधे घेणार नाही असे औटी याने लिहून दिले आहे.

**डॉ. संजय घोगरे,**
जिल्हा शल्य चिकित्सक

### मदत करणारांची चौकशी करा

आरोपी औटी हा फोनवर बोलतानाचा व्हिडीओ तसेच छायाचित्रेही व्हायरल झाली आहेत. त्याला रूग्णालयातून व्हिआयपी वागणूक पुरविण्यात आली. काहीही आजार नसतना त्याला रूग्णालयात भरती करण्यात आले. आंदोलनासाठी आम्ही आल्याचे समजताच औटी यास रूग्णालयातून पळविण्यात आले. त्याला मदत करणारांची चौकशी झाली पाहिजे. रूग्णालय प्रशासनाने सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून द्यावे.

**किरण काळे**
शहराध्यक्ष, कॉंग्रेस

### स्वतंत्र खोलीत बडदास्त

दि. २ ऑगस्ट रोजी औटी यास पारनेरहून नगर येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले होते. तिथे गेल्यानंतर त्याची सोनोग्राफी करण्यात आली. मात्र सोनोग्राफीचा अहवाल निरंक आला. त्यानंतर त्याची डॉक्टरांकडून तपासणी करणे बंधनकारक असताना त्यास अपघात कक्षातील स्वतंत्र कक्षात ठेवण्यात आले. त्यानंतर हाडांच्या उपचारासाठी असलेल्या वॉर्डमधील स्वतंत्र खोलीत त्याची बडदास्त ठेवण्यात आली होती. औटी याच्या स्वादुपिंडावर सुज असल्याचे सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र तपासणी अहवाल निरंक आलेला आहे. औटी यास ज्या खोलीमध्ये ठेवण्यात आले तिथे पोलीस उपलब्ध नव्हते शिवाय त्याचे सहकारी बिनदिक्तपणे तिथे वावरत होते असेही सांगण्यात आले.

### आंदोलनानंतर आरोपीस गायब केले

आरोपीला शाही वागणूक दिली जात असल्याची माहीती मिळाल्यानंतर आम्ही सिव्हील हॉस्पिटलमध्ये ठिय्या दिल्यानंतर आरोपी औटी यास रूग्णालयातून गायब करण्यात आल्याचा आरोप आंदोलक किरण काळे यांनी केला. पुण्यातील ललीत पाटील प्रकरणाची पुनरावृत्ती नगरच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये झाली आहे. भाजपाचा कार्यकर्ता असलेला औटी हा कुणाचा कार्यकर्ता आहे हे जिल्हयातील जनतेला माहीती आहे. रूग्णालयातून त्याला सकाळीच डिस्जार्ज दिल्याचे सध्या नियुक्तीस असलेले डॉक्टर सांगतात असेही काळे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

### औटीच्या दोन जामीनांवर निर्णय प्रलंबित

औटी याच्यावर लोकसभा निवडणूकीच्या आदल्या दिवशी दाखल झालेला गुन्हा तसेच बनावट दस्तऐवज तयार करून नगरपंचायत दप्तरी खोटया नोंदी केल्याप्रकरणी दाखल गुन्हयांमधील इतर दोन जामीन प्रलंबित आहेत.

### एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न

यासंदर्भात पारनेरचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्याकडे विचारणा करण्यात आली असता न्यायालयीन कोठडीत असलेल्या विजय औटी याला रूग्णालयात दाखल करण्याबाबत तहसिलदारांचे पत्र प्राप्त झाले होते. ठाणे अंमलदाराने त्यासंदर्भात फोन करून खात्री केली होती.त्यानंतर औटी यास पारनेरच्या ग्रामीण रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथून मंगळवारी रात्री त्याला पारनेर प्राथमिक आरोग्य केंद्रात आणून कारागृहात दाखल करण्यात आल्याचे बारवकर सांगतात तर तहसिलदार गायत्री सैंदाणे यांनी याप्रकरणी आपला काहीही सबंध नसून हे काम पोलीसांचे असल्याचे सांगितल्याने महसूल आणि पोलीस प्रशासन ही जबाबदारी एकमेकांवर ढकलत असल्याचे दिसून येते.

# निघोजात दिसले तर गाठ आमच्याशी !

## गायरान अतिक्रमीत करणाऱ्या आरोपींनी फिर्यादींना धमकावले

निघोज : प्रतिनिधी

**पठारवाडी येथील गायरानावर अतिक्रमण केल्याप्रकरणी न्यायालयात याचिका दाखल केली तसेच स्टोन क्रशरमुळे होणाऱ्या नुकसानीमुळे ते बंद पाडण्यास भाग पाडल्याचा राग मनात धरून निघोजचे उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे व सुनील पवार यांनी तक्रारदारांना निघोजमध्ये दिसले तर गाठ आमच्याशी आहे अशी धमकी दिली. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



यासंदर्भात अनिल भाऊ सुपेकर यांनी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे की, निघोज येथे दि.६ ऑगस्ट रोजी सकाळी साडे आठ वाजण्याच्या सुमारास निघोज ग्रामपंचायत कार्यालयासमोर वरखडे व पवार यांनी ही धमकी दिली.

पठारवाडी शिवारातील गट क्र.१०२९ मध्ये आरोपींचे स्टोन क्रशर आहे. या ठिकाणी सरकारी गायरान जमीन आहे. या जमीनीवर आरोपींनी अतिक्रमण केले म्हणून पठारवाडी ग्रामस्थांनी न्यायालयात दाद मागण्यासाठी कमिटीची स्थापना केलेली आहे. कमिटीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेमध्ये फिर्यादी अनिल सुपेकर साक्षीदार सदस्य आहेत.

स्टोन क्रशरच्या हादऱ्यांमुळे कुकडी कालव्यांमध्ये दगड पडून नुकसान झालेले आहे. स्टोन क्रशरसाठी दगड घेऊन जाणारी वाहने भरधाव वेगाने जात असल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण होते. त्यामुळे पठारवाडी ग्रामसभेने ठराव घेउन तहसिलदार तसेच संबंधितांशी पत्रव्यवहार करून हे क्रशर बंद पाडण्यास भाग पाडले आहे. क्रशर बंद केले तसेच गायरान जमीनीवरील अतिक्रमणाविरोधात न्यायालयात याचिका दाखल केल्याचा राग मनामध्ये धरून निघोज येथे फिर्यादी अनिल सुपेकर, पांडूरंग सदाशिव पठारे, मोहन बबन पवार, मंगेश भास्कर पवार यांना आरोपी वरखडे व पवार यांनी तुम्ही निघोजमध्ये यायचे नाही, तुम्ही आमचे क्रशर बंद केले, आमच्याविरोधात न्यायालायात याचिका दाखल केली अशी विचारणा करत शिविगाळ करून परत निघोज गावात दिसले तर आमच्याशी गाठ आहे अशी दमबाजी केल्याचे फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे.


# सर्व भगिनींना योजनेचा लाभ मिळवून देणार

## लाडकी बहिण योजनेचा सुनील थोरातांकडून आढावा

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील ४५ हजार भगिनींनी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठी अर्ज दाखल केले असून ते सर्व वैध ठरले आहेत. उर्वरीत भगीनींना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आपण पुढाकार घेणार असलयाचे या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गठीत करण्यात असलेल्या समितीचे अध्यक्ष सुनील थोरात यांनी सांगितले.**

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या अंमलबजावणीसाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अध्यक्षपदी सुनील थोरात तर सदस्य म्हणून प्रतिक शेळके, अकोळनेर, सुभाष सासवडे धोत्रे यांची नियुक्ती करण्यात आली असून बुधवारी पंचायत समितीच्या सभागृहात थोरात यांच्या उपस्थितीत या योजनेचा



आढावा घेण्यात आला, त्यावेळी थोरात हे बोलत होते. यावेळी तहसिलदार गायत्री सैंदाणे, गटविकास अधिकारी दयानंद पवार हे उपस्थित होते.

थोरात म्हणाले, आतापर्यंत या योजनोसाठी पारनेर तालुक्यातून ४५ हजार भगिनींनी आपले अर्ज दाखल केले असून त्या सर्व भगिनी या योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत. तालुक्यातील प्रत्येक भगिनीला या योजनेचा लाभ मिळवा यासाठी आपण प्रयत्न करणार असून पालकमंत्री राधाकृष्ण विखे, मा. खा. डॉ. सुजय विखे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहचविण्याचा आपला प्रयत्न राहील. इतक्या मोठया संख्येने लाभ देणारी महिलांसाठीचीही पहिलीच योजना असून ही योजना राबविल्याबद्दल थोरात यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, राज्याचे महसूल तथा जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे अभिनंदन केले.

थोरात म्हणाले, या योजनेसाठी पात्र ठरलेल्या भगिनींसाठी दरमहा ६ कोटी ७५ लाख रूपये मिळणार असून येत्या रक्षाबंधनाला प्रत्येक भगिनीच्या खात्यामध्ये तीन हजार रूपये जमा होणार आहेत.


# अस्तगांवच्या सरपंचांविरूध्द अविश्वास ठराव मंजूर

## अविश्वास ठरावाच्या बाजूने सात तर विरोधात शुन्य मते

अस्तगांव : प्रतिनिधी

**अस्तगांवच्या सरपंच लताबाई सुरेश काळे यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव मंगळवारी सात विरूध्द शुन्य मतांनी मंजूर करण्यात आला. सरपंच लताबाई काळे व उपसरपंच ईश्वर धर्मा पठारे हे बैठकीस अनुपस्थित होते.**

सरपंच काळे यांच्या विरोधात गेल्या गुरूवारी नऊ पैकी सात सदस्यांनी तहसिलदार गायत्री सैंदाणे यांच्याकडे अविश्वास ठराव दाखल केला होता. तहसिलदार सैंदाणे यांनी ठराव दाखल करणाऱ्या सदस्यांची ग्रामसेवकाच्या उपस्थितीत पडताळणी केल्यानंतर ठराव दाखल करून घेण्यात आला व मंगळवार दि.६ ऑगस्ट रोजी तहसिलदार सैंदाणे यांच्या उपस्थितीमध्ये ग्रामपंचायत सदस्यांच्या विशेष बैठकीचे अविश्वास ठरावावर चर्चा करून मतदान घेण्यासाठी आयोजन करण्यात आले होते. मंगळवारी सकाळी अविश्वास ठराव दाखल करणारे सात सदस्य बैठकीस उपस्थित राहिले तर सरपंच, उपसरपंच यांनी बैठकीपासून दुर




राहणे पसंत केले. त्यामुळे सरपंच काळे यांच्याविरोधातील अविश्वास ठराव सात विरूध्द शुन्य मतांनी मंजूर करण्यात आला.

अविश्वास ठराव दाखल करणाऱ्या सदस्यांमध्ये सदस्य सिमा प्रमोद काळे, सुरेश गोरक्ष काळे, वैभव रावसाहेब काळे, रेश्मा केशव काळे, जालिंदर दत्तात्रेय काळे, संध्या कल्याण काळे व अलका शिवाजी नाणेकर यांचा समावेश होता. उर्वरीत पान ३ वर

# वाडेगव्हाणच्या तुकाई मंदिरात चोरी करणारा अट्टल चोरटा जेरबंद !

## ■ पुणे ग्रामीण पोलीसांची दमदार कामगिरी ■ ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त



शिरुर : प्रतिनिधी

**वाडेगव्हाण ( ता. पारनेर ) येथील तुकाई देवी मंदिरातील देवीचे दागिने आणि दानपेटीतील रोख रक्कम चोरणाऱ्या अट्टल गुन्हेगाराला पुणे ग्रामीण पोलीसांनी बेड्या ठोकल्या आहेत. विनायक दामू जिते (रा. कान्हूर मेसाई, ता. शिरूर) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे.**

गेल्या १३ डिसेंबरच्या मध्यरात्री चोरट्यांनी वाडेगव्हाणच्या तुकाई मंदिरात प्रवेश करून चोरी केली होती. यात देवीचे दागिने व दानपेटीतील रोख रक्कम लंपास केली होती. यामध्ये ३० हजार रुपये किंमतीचा चांदीचा पुरातन मुखवटा, अर्धा तोळे वजनाचे मंगळसूत्र, सोन्याचे मनी व पळी असलेले देवीच्या मुखवट्यावरील दागिने, एक ग्रॅम वजनाची सोन्याची नथ, २५ भार वजनाची चांदीची कपाळपट्टी, ४० भार वजनाची चांदीची छत्री, चांदीचे पैंजण, २ सोन्याच्या नथ, दोन दानपेट्यामधील ४ हजार रुपये रोख असा एकूण १ लाख रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला होता.त्यावेळी पोलीसांनी सर्व बाजूंनी उर्वरीत पान ३ वर






# तंत्रमंत्र

## विज्ञानयुगातील बितंबातम्या

# पासवर्ड असे ठेवा सेव्ह!

**तुमचे सगळे पासवर्ड सुरक्षितरित्या सेव्ह करण्यासाठी काही ॲप्स मदत करतात, त्याविषयी...**




- ब्लर : हे ॲप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करण्याबरोबरच पासवर्ड तयार करण्यासाठी आणि ते ऑटो-फील करण्यासाठी सुद्धा वापरता येऊ शकतं. लॉग इन आणि पासवर्ड यामध्ये लॉग इन इन्फॉर्मेशन ॲड करता येते. ॲड केलेली माहिती नंतर कॉपी, एडीट आणि डिलीट करता येते. यामध्ये स्वतंत्र प्रायव्हेट ब्राऊजर उपलब्ध आहे जो वापरून एखाद्या वेबसाइटवर आपलं लॉग इन आणि पासवर्ड ऑटोफिल करता येतात. हे ॲप्लिकेशन आयओएस, अँड्रॉइड, विंडोज आणि मॅक यावर उपलब्ध आहे.
- स्टिकी पासवर्ड : स्टिकी पासवर्ड ॲप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करून ते ऑटोफिल करण्याची सुविधा देतं. हे ॲप्लिकेशन विंडोजसाठी असलेले क्रोम, क्रोमियम, फायरफॉक्स, थंडरबर्ड, इंटरनेट एक्सप्लोरर या ब्राऊजरवर तर अँड्रॉइडसाठी फायरफॉक्स, डॉल्फीन आणि यूसीवेब या ब्राऊजरवर आणि आयओएसवर सफारी या ब्राऊजरवर वापरता येतं. मॅकवर हे सफारी बरोबरच क्रोमवर सुद्धा वापरता येतं.
- डॅशलॅन : आयओएस, अँड्रॉइड, विंडोज आणि मॅक यावर उपलब्ध असणारं हे ॲप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करून ते ऑटोफिल करण्यास मदत करतं. जर आपण वापरात असलेली एखादी साइट सेक्युअर नसेल तर तसं सूचितही करतं. यामुळे संभाव्य धोका टळू शकतो. या ॲप्लिकेशनमध्ये अन्य ॲप्लिकेशन जसे की वन पासवर्ड, रोबोफोर्म आणि लास्टपास यात सेव्ह केलेली माहिती इम्पोर्ट करण्याची सुविधा आहे. यात आपण सेव्ह केलेली माहिती फक्त आपल्या डिव्हाइसवर ठेवायचा पर्यायसुद्धा दिला गेला आहे.

### ही काळजी घ्या...

- ठरावीक कालावधीनंतर पासवर्ड बदला.
- पुन्हा तोच पासवर्ड ठेवणं टाळा.
- पासवर्डमध्ये नंबर, स्पेशल कॅरॅक्टर, कॅपिटल आणि स्मॉल लेटर्स ठेवून तो अधिक सुरक्षित करावा.
- अन्य कोणाशीही पासवर्ड शेअर करू नये.
- पासवर्डमध्ये आपली वैयक्तिक माहिती जसं की नाव, जन्मतारीख याचा वापर करणं टाळा.
- सगळ्या ठिकाणी एकच पासवर्ड वापरू नये.
- जर पासवर्ड कुठे स्टोअर केले असतील तर ते अन्य कोणाला सहज मिळणार नाहीत याची काळजी घ्यावी.
- आठ ते बारा कॅरॅक्टर्सचा पासवर्ड हा अधिक सुरक्षित मानला जातो.

- पासवर्ड बॉस : पासवर्ड सेव्ह करून ऑटोफिलची सुविधा देणारं हे ॲप्लिकेशन विंडोज, अँड्रॉइड, आयओएस यावरच उपलब्ध आहे. मॅक आणि लिन्युक्स यावर हे ॲप्लिकेशन उपलब्ध नाही. वन पासवर्ड, रोबोफोर्म आणि लास्टपास हे डॅशलॅन बरोबरच क्रोम, इंटरनेट एक्सप्लोरर, फायरफॉक्स, ओपेरा आणि एज या ब्राऊजर्समधून सुद्धा लॉगिन माहिती यात इम्पोर्ट करता येते.

# ८४ टक्के लोक जोडीदाराशी शेअर करतात पासवर्ड!

आपण कितीही प्रायव्हसीच्या गोष्टी करत असलो तरी ८४ टक्के भारतीय त्यांचे पासवर्ड त्यांच्या जोडीदाराबरोबर शेअर करत असल्याचं एका अभ्यासातून समोर आलं आहे. इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स, सोशल मीडिया हे सगळं सध्याच्या जीवनशैलीचा एक भाग आहे. दोघांच्या नात्यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा ठरत असून जोडीदाराबरोबर पासवर्ड शेअर करण्यात काहीच चुकीचं नसल्याचं अनेकांना वाटतयं. मॅक्फी संस्थेच्या एका अहवालातून ही बाब समोर आली आहे. ६०० लोकांचा सर्व्हे करण्यात आला. त्यानुसार, तंत्रज्ञानाचा वापर नात्याचा एक भाग असल्याचं मत ७७ टक्के लोकांनी व्यक्त केलं. नात्यात प्रायव्हसी महत्त्वाची असते, असं ८९ टक्के भारतीयांनी सांगितलं. ६७ टक्के तरुण मुला- मुलींना वाटतं की त्यांच्या जोडीदाराचं त्यांच्यापेक्षा इंटरनेटवरच जास्त लक्ष असतं. तर, ८१ टक्के भारतीयांच्या मते, त्यांचे मित्र व कुटुंबातील सदस्य त्यांच्या सोबत असतानाही मोबाइलमध्येच जास्त रमलेले असतात.

# ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटना



देशात अलीकडच्या काही वर्षांत अनेक लोकांनी डिजिटल आर्थिक व्यवहार सुरू केल्याचे चित्र आहे. याचाच गैरफायदा घेऊन आर्थिक सायबर क्राइम वाढल्याचे या सर्वेक्षण अहवालात म्हटले आहे. एफआयएस या नवनव्या तंत्रज्ञानावर आधारित आर्थिक सेवा उपलब्ध करून देणाऱ्या कंपनीच्या वतीने हा अहवाल नुकताच तयार करण्यात आला आहे. भारतीयांनी डिजिटल तंत्रज्ञानावर स्वार होऊन कॅशलेस आर्थिक व्यवहारांत वेग धरला असला, तरीही डिजिटल व्यवहार करताना कुठली काळजी घ्यावी, काय करावे आणि काय करू नये, स्वतःची खासगी माहिती गुप्त ठेवून फिशिंग मेलपासून स्वतः चे आर्थिक रक्षण कसे करावे, याबाबत मात्र त्यांच्यात पुरेशी जागृती झालेली नाही, असे या अहवालात म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर बँकांची जबाबदारी वाढली असून, डिजिटल व्यवहारांसाठी त्यांनी ग्राहकांना अधिक सुरक्षित तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यायला हवे; तसेच ग्राहकांना हे व्यवहार सुरक्षितपणे कसे करावेत, याचे प्रशिक्षणही द्यावे, अशी मागणी आता जोरकसपणे पुढे येताना दिसून येत आहे.




**एकीकडे देशातील डिजिटल आर्थिक व्यवहारांत वाढ होत चाललेली असतानाच दुसरीकडे ऑनलाइन आर्थिक गुन्हेगारीदेखील वेगाने वाढत असल्याचे धक्कादायक वास्तव एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. डिजिटल व्यवहारांतील अनेक उणीवांचा आणि त्रुटींचा फायदा घेऊन आर्थिक सायबर क्राइम तसेच लोकांची ऑनलाइन ओळख चोरून त्यांच्या नावाने आर्थिक गैरव्यवहार करण्याचे प्रकार (आयडेंटीटी थेप्ट) देशात वाढीला लागल्याचे दिसून आले आहे. चालू वर्षात आर्थिक फसवणुकीचे बळी ठरलेल्या लोकांची संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत दुप्पट झाल्याचे या सर्वेक्षणात म्हटले आहे.**

### अहवालातील महत्त्वपूर्ण निरीक्षणे

- २०२३ या वर्षात आर्थिक फसवणुकीचे बळी ठरलेल्या लोकांची संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत दुप्पट झाल्याचे या अहवालात म्हटले आहे.
- आर्थिक फसवणुकीचा फटका बसणाऱ्या लोकांपैकी ९६ टक्के लोकांना मोबाइल ॲपमधून बसला फटका.
- आर्थिक फसवणुकीचे सर्वाधिक बळी २७ ते ३७ या वयोगटातील.
- मोबाइल ॲपचा वाढता वापर, डिजिटल पेमेंट आणि ऑनलाइन आर्थिक फसवणूक यात थेट संबंध.
- ऑनलाइन आर्थिक व्यवहारांच्याबाबत देशातील लोकांची जागृती गरजेची. बँकांचे ४१ टक्के व्यवहार आता होतात ॲपवरून.
- मोबाइल पेमेंट आता कॅश आणि कार्ड पेमेंटपेक्षाही वाढले.

# कॅशलेस होताना...

**रोकडविरहित व्यवहारांची सोय होण्याऐवजी त्यामुळे ताण वाढतो आहे. कारण यासाठी अतिरिक्त शुल्क द्यावे लागत आहे. लोकांनी अधिकाधिक व्यवहार कॅशलेस करावेत यासाठी सरकारकडून काही सवलतीही देण्यात आल्या आहेत. कॅशलेस व्यवहारात संबंधित व्यक्तीने दिलेली ओळख चोरीला जाण्याची भीती आहे. मग कॅशलेसचे फायदे-तोटे नेमके कोणते आहेत, ते जाणून घेण्याचा हा प्रयत्न...**

### कॅशलेसचे फायदे

- सुविधा : आर्थिक व्यवहार करण्यातील सुलभता हा कॅशलेस होण्यासाठी उद्युक्त करणारा सर्वात मोठा घटक आहे. प्रत्येक व्यवहारासाठी तुम्हाला रोकड घेऊन जाण्याची गरज नाही की एटीएममधून पैसे काढण्यासाठी रांगेत उभे राहण्याचीही गरज नाही. प्रवासात कॅशलेस व्यवहार खूप उपयुक्त ठरतात. तुम्हाला कुठेही व कधीही यामुळे व्यवहार पूर्ण करणे सोपे जाते.




- सवलती : डिजटल प्रणालीने इंधन खरेदी केल्यास त्यावर ०.७५ टक्के सूट, रेल्वे तिकिटे, महामार्गाचा टोल, विमा खरेदी या सर्वांवर देण्यात येणारी सूट हादेखील त्याचाच एक भाग आहे. मोबाइल वॉलेट कंपन्यांनी दिलेल्या सवलती यांची यात भर पडली आहे.
- खर्चाचा मागोवा शक्य : सर्व व्यवहार नोंदवले जात असल्यामुळे खर्चाचा मागोवा घेणे लोकांना खूप सोपे जाणार आहे. याचा उपयोग आयकर विवरणपत्र भरताना तसेच आयकरविषयक चौकशीच्या वेळी होणार आहे. त्याचप्रमाणे महिन्याच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करतानाही याचा उपयोग लोकांना होणार आहे.
- अंदाजपत्रकाला शिस्त : तुमच्या घरच्या मासिक अंदाजपत्रकाला शिस्त लागणार आहे. मोबाइल ॲप व टूल्स यामुळे लोकांना त्यांच्या खर्चाची पद्धत पाहणे शक्य होते, ज्यामुळे मागील काही वर्षांतील खर्चाचा आढावाही घेता येतो. खर्च नियंत्रित झाल्यास गुंतवणूक वाढवणे शक्य होते. अनावश्यक खर्चाला आळा घालणेही यामुळे शक्य होते.
- कमी जोखीम : चोरी झाल्यास तुम्हाला तुमचे कार्ड ब्लॉक करता येते किंवा मोबाइल वॉलेट ब्लॉक करता येते. परंतु रोकड चोरीला गेल्यास ती परत मिळणे दुरापास्त असते. याचा फायदा प्रवासादरम्यान होतो.
- छोटे फायदे : जेवढे बिल झाले असले तेवढीच रक्कम तुम्हाला (सुट्या पैशांत बिल झाले असले तरी) भरता येते. त्यामुळे दुकानदारांची सुटे पैसे देण्यातून सुटका होते.


### कॅशलेसचे तोटे

- ओळखचोरीची भीती : कॅशलेस व्यवहारांत ओळखचोरीची सर्वाधिक भीती असते. आपण कॅशलेस व्यवहारांना सरावलेले नसल्यामुळे फिशिंग मेल्सच्या जाळ्यात शिक्षित लोकही अलगद सापडतात. गैरप्रकार झाल्यास त्यावर कारवाई करण्यासाठी प्रभावी यंत्रणा आपल्याकडे नाही.



एखाद्या गरीब रिक्षावाल्याचा आधार क्रमांकच चोरीला गेला तर तो काय करणार? अशावेळी तपास यंत्रणा तोकडी असल्याचा फटका कॅशलेस व्यवहारांना बसू शकतो. याशिवाय बँकांच्या डेटाबेसमधून माहिती चोरीला गेल्यास त्याचाही फटका बसू शकतो.
- फोन हरवणे : कॅशलेस व्यवहारांसाठी केवळ मोबाइल फोनवरच अवलंबून राहणार असाल तर या फोनची चोरी झाल्यास तुम्हाला त्याचा मोठा फटका बसू शकतो. तुम्ही परदेशात असाल किंवा प्रवास करत असला आणि अशी घटना घडली तर त्यामुळे तुमची पंचाईत होऊ शकते. शिवाय तुम्हाला तुमचा फोन सतत चार्ज्ड ठेवावा लागतो. फोनची बॅटरी उतरल्यास तुम्हाला कॅशलेस व्यवहार करता येत नाहीत.
- तंत्रज्ञानाला न सरावलेल्यांसाठी अवघड : देशात केवळ ३४.८ टक्के इंटरनेटचा प्रसार झाला आहे. एकूण मोबाइल वापरकर्त्यांपैकी केवळ २६.३ टक्के लोकांकडे स्मार्टफोन आहेत. डिजिटल होण्यामध्ये मानसिकता न बदलणे ही मोठी समस्या आहे. याचा त्रास ज्येष्ठ नागरिकांना सर्वाधिक होतो.
- अतिखर्च : प्रत्यक्ष रोकड खर्च करावी लागत नसल्याने खर्चात वाढ होऊ शकते. रोकड प्रत्यक्ष बाळगून खर्च करावी लागल्यास हातातून पैसे जात आहेत या कल्पनेनेच खर्चावर नियंत्रण येते. मात्र कार्डांनी किंवा मोबाइल वॉलेटने पैसे द्यावे लागल्यास जवळची रोकड जात नसल्याने अधिक खर्चाची प्रवृत्ती वाढीस लागण्याची भीती असते.

# इंटरनेट बँकिंगची सुविधा




**घरोघरी आज इंटरनेटचा वापर वाढला आहे. त्यामुळे जवळपास सर्वच बँकांनी इंटरनेटद्वारे बँकिंगची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नेटबँकिंगच्या सुविधेचा वापर करताना आपल्याकडून नजर चुकीने काही त्रुटी राहतात आणि सायबर चोरांकडून हॅकिंगसारखे प्रकार घडून आपणास नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे आपण नेटबँकिंग प्रणाली समजून घेऊ. आज सर्वच बँका आपापल्या नेटबँकिंग प्रणालीमध्ये ग्राहकांची व व्यवहाराची सुरक्षा व गोपनीयता राखण्यास प्राधान्य देतात. सर्वसाधारणपणे या सुविधेचा वापर करताना बँक तुमचे दोन गोपनीय पासवर्ड विचारते, म्हणजेच जोवर आपण हे दोन्ही पासवर्ड देत नाही तोवर व्यवहार पूर्ण होत नाहीच. त्याचप्रमाणे काही बँका अजून सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने तुमच्या मोबाइलवर पासवर्ड पाठवून व्यवहार तुम्हीच करत आहात ना, याची खात्री करून घेते. सर्वात पहिला व महत्त्वाचा नियम म्हणजे, कुठलीही बँक व बँकेचा प्रतिनिधी फोन, ई-मेल व वैयक्तिकरित्या तुम्हास खात्याबद्दल व पासवर्डबद्दल विचारणा करत नाही. सर्वसाधारणपणे बरेचसे ग्राहक या जाळ्यात फसतात.**

### सुरक्षिततेसाठी काय कराल?

- बँकखात्याची माहिती कुणालाही अगदी बँकेलाही फोन, ई- मेल वा वैयक्तिकरित्या देऊ नका.
- पासवर्ड नियमितपणे दर १५ दिवसांनी बदलत राहा. पासवर्ड अतिशय कठीण पातळीचा ठेवा त्यात, शब्द अंक, विशेष चिन्हांचा वापर करा. बँकेची एसएमएस सुविधा सुरू ठेवा.
- बँकेचे व्यवहार सायबर कॅफेमधून न करता घरातील कम्प्युटरवर करा. बँकेचे संकेतस्थळ नीट पाहून टाइप करा. एचटीटीपीएस दिसत नसल्यास व्यवहार करू नका.

### प्रतिबंधक उपाय...

- सायबर विश्वातील बहुतेक आर्थिक गुन्हे पासवर्ड व लॉग इन आयडी चोरून घडतात. बऱ्याचशा एक्स्पर्ट कम्प्युटर वापरणाऱ्यांनासुद्धा त्यांच्या नकळत पासवर्ड व लॉग इन आयडी चोरला जाऊ शकतो याची नीटशी कल्पना नसते. बँक अशा प्रकारे घडलेल्या गुन्ह्यातील आर्थिक नुकसानीची जबाबदारी घेत नाहीत. काही बँका तुम्हाला दर दोन आठवड्यांनी तुमचा पासवर्ड बदलण्यास भाग पाडतात. हे सायबर गुन्हे टाळण्यासाठी हे महत्त्वाचे आहे.




- आर्थिक व्यवहार करण्यासाठी संस्था अथवा बँका त्यांच्या अधिकृत संकेतस्थळाचा इंटरनेटवरचा पत्ता (यूआरएल) तुम्हाला पाठवते. तो पत्ता जर एचटीटीपी या शब्दाने चालू होत नसेल तर सावधान. एचटीटीपी या शब्दाने चालू होणारे इंटरनेटवरचे सर्व यूआरएल सुरक्षित नसतात. एचटीटीपी पत्ता असणाऱ्या संकेतस्थळावर तुम्ही टाइप केलेला सर्व मजकूर इंटरनेटला जोडलेली कुठलीही व्यक्ती थोड्या प्रयत्नांती वाचू शकते व त्या माहितीचा गैरवापर करू शकते.
- कम्प्युटर सुरक्षेच्यादृष्टीने कुठलीही महत्त्वाची माहिती चॅट करताना टाइप करू नका. उदा : क्रेडिट कार्ड नंबर, पॅनकार्ड नंबर, तुमची जन्मतारीख आदी. तुम्ही जर चॅट करताना मायक्रोफोन व वेब कॅमेरा वापरत असाल तर त्यामार्फत तुम्हाला नकळत तुमच्या हालचाली, फोनवरची बातचित, तुम्ही की-बोर्ड वरची कुठली बटने दाबलीत हे सायबर चोर प्रयत्नांती समजू शकतो. त्या माहितीचा उपयोग करून तुमचा पासवर्ड पण चोरला जाऊ शकतो. यावर सोपा उपाय म्हणून मायक्रोफोन व वेब कॅमेरा काम झाल्यावर बंद करा किंवा झाकून ठेवा.
- सध्या स्पायवेयरचा प्रसार प्रचंड वाढलाय. काही ई-मेल उघडल्यावर लगेचच तुमच्या कम्प्युटरमध्ये स्पायवेयर शिरू शकते. तसेच, काही गेम्स व प्रोग्रॅम्स डाउनलोड करताना पण स्पाय वेयर शिरू शकते. अशा विविध प्रकारांनी स्पाय वेअर तुमच्या नकळत तुमच्या कम्प्युटरमध्ये शिरतात आणि तुम्ही कम्प्युटरवर काय करता याची पूर्ण खबर ठेवतात. तुमची खासगी माहिती, पासवर्ड, कोणते प्रोग्रॅम वापरले, कुठल्या वेबसाइटना भेटी दिल्या ही माहिती सायबरचोरांच्या हाती लागू शकते. दोन किंवा तीन दिवसांनी कम्प्युटरच्या वापरामुळे जमा झालेली तात्पुरती डाउनलोडेड माहिती व जुनी वेब पेजेस कायमस्वरूपी काढून टाकत चला. कम्प्युटर आणि इंटरनेटचे फायदे पाहता कम्प्युटर न वापरणे हा पर्याय नसून काळजी घेतली तर या सायबर चोरांवर मात करणे अजिबात अवघड नाही.

### कसे कराल पैसे ट्रान्सफर?

#### नेटबँकिंगच्या मर्यादा

नेटबँकिंग हा बँकेकडून ग्राहकाला दिलेला आर्थिक व्यवहाराचा कॅशलेस पर्याय आहे. यामुळे कसलाही व्यवहार करण्यासाठी बँकेत जाण्याची गरज नाही. एका दिवसात कोणत्याही बँकेच्या ग्राहकाला एक रुपयापासून ते १० लाखापर्यंत पैसे पाठवता येऊ शकतात. यासाठी कोणताही अधिकचा कर लागत नाही. सध्या नेटबँकिंगचा वापर जवळपास २०० टक्क्यांनी वाढल्याचं बोललं जात आहे. नेट बँकिंग प्रक्रिया सर्व बँकांची थोड्या फार फरकाने सारखीच आहे.



कस्टमर आय.डी. आणि आयपिन मिळाल्यानंतर संबंधित बँकेच्या अधिकृत वेबपेजवर जावे. तिथे पहिल्यांदा कस्टमर आयडी टाकण्याचा पर्याय येईल. कस्टमर आयडी टाकल्यानंतर आयपिन टाकण्याचा पर्याय येईल. लॉग इन केल्यानंतर पहिल्यांदा खात्याचा तपशील दाखवला जाईल. बाजूलाच फंड ट्रान्सफर हा पर्याय दिलेला आहे. पैसे ट्रान्सफर करण्यासाठी ज्यांना पैसे पाठवायचे आहेत, त्यांच्या बँकेचा आयएफएससी कोड, बँक खाते नंबर आवश्यक आहे. पैसे ट्रान्सफर करण्यासाठी अगोदर बेनिफिशिअरी क्रमांक म्हणजे ज्यांना पैसे पाठवायचे आहेत, त्यांचा तपशील तयार करणं गरजेचं आहे. फंड ट्रान्सफरमध्ये गेल्यानंतर बाजूलाच रिक्वेस्ट हा पर्याय आहे. त्यावर क्लिक केल्यानंतर ॲड बेनिफिशिअरी हा पर्याय दिसेल. त्यामध्ये ज्यांना पैसे पाठवायचे त्यांचा आयएफएससी कोड, खाते क्रमांक ही माहिती दिल्यानंतर पुढील स्टेपमध्ये जावे. खाते क्रमांक, आयएफएससी कोड टाकून पुढे गेल्यानंतर कन्फर्म करण्यापूर्वी तुमच्या रजिस्टर केलेल्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी येईल. तो ओटीपी टाकून बेनिफिशिअरी तयार करावं. बेनिफिशिअरी तयार केल्यानंतर सरासरी ३० मिनिटांनंतर तुम्ही पैसे पाठवू शकता. ३० मिनिटांनंतर इतर बँकांना पैसे पाठवता येतील. त्याच बँकेच्या ग्राहकाला पैसे पाठवायचे असतील तर ट्रान्सफर विदिन बँक हा पर्याय निवडावा किंवा इतर बँकेच्या ग्राहकाला पैसे ट्रान्सफर करायचे असतील तर ट्रान्सफर टू ऑदर बँक हा पर्याय निवडावा. त्याच बँकेच्या ग्राहकालाच पैसे पाठवायचे असतील तर तीन स्टेपमध्ये पैसे पाठवता येतात. पहिल्या स्टेपमध्ये तुम्हाला सेव्हिंग किंवा करंट अकाऊंटमधून पैसे पाठवायचे आहेत, तो पर्याय निवडावा. त्यानंतर ट्रान्सफर नाऊ हा पर्याय निवडून तुम्ही ॲड केलेल्या बेनिफिशिअरीचा क्रमांक निवडावा. जेवढे पैसे पाठवायचे आहेत ती रक्कम टाकावी. त्यानंतर कन्फर्म करावं. कन्फर्म केल्यानंतर तुम्हाला खात्याशी कनेक्टेड मोबाईल क्रमांकावर ओटीपी येईल. ओटीपी टाकल्यानंतर काही क्षणात पैसे ट्रान्सफर होतील.

### या चुका करू नका...

कोणत्याही व्यक्तीसोबत आपला अकाउंट पासवर्ड शेअर करू नका. कोणत्याही अज्ञात लिंक किंवा अटॅचमेंटला ओपन करू नका. ऑनलाइन बँकिंगचा वापर केल्यानंतर त्याचे लॉगइन तसेच ठेवू नका. नेहमी लॉगआउट जरूर करा. आपली पर्सनल यूएसबी किंवा हार्ड डिस्कचा वापर कोणत्याही अन्य दुसऱ्या लॅपटॉप किंवा कम्प्युटरवरून करू नका. सोशल मीडियावर कधीही आपली जन्मतारीख, पत्ता, फोन नंबर यासारखी माहिती उघड करू नका. यावरून ऑनलाइन फ्रॉड होऊ शकतो.

## शॉर्ट न्यूज

### मंत्रीपद मिळावे म्हणून बद्रीनाथ चरणी साकडे

■ **कोपरगाव :** आपण संकटात असतांना आपली काळजी करणाऱ्या जीवाभावाच्या नेत्याला भगवान बद्रिनाथाच्या चरणी आ. आशुतोष काळेंना मंत्रीपद मिळावे अशी प्रार्थना करून साकडे घातले आहे. कोपरगाव मतदार संघातील आ. आशुतोष काळे यांचे कार्यकर्ते केदारनाथ, बद्रीनाथ यात्रेसाठी गेले असून काही दिवसांपूर्वी उत्तराखंड मध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होवून पूल व रस्ते वाहून गेल्यामुळे या कार्यकर्त्यांना केदारनाथाचे दर्शन न घेता माघारी परतावे लागले होते.

### आ. राम शिंदे यांची अध्यक्षपदी निवड

■ **जामखेड :** राज्यातील महिला भगिनींसाठी महायुती सरकारने हाती घेतलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या अंमलबजावणीसाठी सरकारने विधानसभा मतदारसंघनिहाय समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अध्यक्षपदी आमदार प्रा. आ. राम शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून याबाबतचा आदेश जारी करण्यात आला आहे.

### तुळजाभवानी मंदिराची दानपेटी फोडली

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील शिरसगाव इंदिरानगर येथील तुळजाभवानी मंदिरात पहाटे तीनच्या सुमारास मंदिराची दानपेटी फोडून त्यातील सर्व रक्कम आदी चोरून नेले आहे. त्याचप्रमाणे तुळजाभवानी मूर्तीवरील दागिने प्रथम काढण्यात आले. त्या आधी मंदिराचे दार उघडण्याचा प्रयत्न झाला पण दार उघडता न आल्याने मंदिराच्या मागील बाजूस वर असलेल्या दोन खिडक्यापैकी उजव्या बाजूच्या खिडकीवरील प्लास्टिक कागद बाजूला करून दोन चोरापैकी एका चोराने खिडकीतून मंदिरात प्रवेश केला व चोरी केल्याचे सीसीटीव्ही फुटेजवरून दिसते.

### तांदळी दुमाला येथे एलसीबीचा छापा

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील तांदळी दुमाला येथे एलसीबीने केलेल्या कारवाईत हातभट्टी दारू विक्री राजरोस होत असल्याचे दिसून आले आहे. हातभट्टी दारू विक्री बरोबरच अड्ड्यावरती गुटख्या सह गांजाच्या पुड्याचे पाकीटे मिळुन आल्याने खळबळ उडाली आहे. कारवाई करत आल्याचे लक्षात येताच काही अवैध धंदे करणाऱ्यांनी दुकानं बंद करून काढता पाय घेत फरार झाले. एलसीबी पथकाने केलेल्या कारवाईत हातभट्टी दारू, गुटख्यासह गांजाची पाकीटे जप्त करण्यात आली असुन विक्री करणाऱ्या ४ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.

### भाजप कार्यकर्त्यांचा आ. गडाख गटात प्रवेश

■ **नेवासा :** तालुक्यातील निपाणी निमगाव येथे आ. शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ता संवाद मेळावा माजी सभापती सुनीता गडाख यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडला. याप्रसंगी भाजप चे प्रकाश आदमने, शिवाजी आदमने, माणिकआदमने यांनी, आ शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याचा निर्णय घेत सुनिता गडाख यांचे हस्ते गडाख गटात प्रवेश केला. आ. गडाख यांच्या विकास कामाला गती देण्यासाठी आम्ही गडाख गटात प्रवेश करत आहोत असे ते म्हणाले याप्रसंगी गावातील महिला, युवक व ज्येष्ठ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खोट्या प्रचाराला रोखण्यासाठी वैचारीक लढाई करावी लागणार

■ भाजपा राष्ट्रीय सचिव विजया राहटकर यांचे आवाहन ■ राहत्यात उत्तर नगर जिल्ह्याचे अधिवेशन




**राहाता : प्रतिनिधी**

**विरोधकांच्या खोट्या प्रचाराला रोखण्यासाठी भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला बुथ पासून ते सोशल मीडियावर वैचारीक लढाई करावी लागणार आहे. लोकाभिमुख कामांमुळे महायुती सरकार सत्तेवर येणार असल्याने 'अपनी सरकार अच्छी सरकार' हा संदेश घरोघरी योजनांच्या माध्यमातून पोहचवण्याचे आवाहन भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकार यांनी केले.**

भारतीय जनता पक्षाचे उत्तर नगर जिल्ह्याचे अधिवेशन राहता येथे संपन्न झाले. जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे, माजी आमदार वैभव पिचड, सरचिटणीस नितिन दिनकर, नितीन कापसे, महिला जिल्हाध्यक्षा सौ.कांचन मांढरे, ओबीसी मोर्चाचे प्रकाश चित्ते, बाळासाहेब गाडेकर,डॉ.विखे पाटील कारखान्याचे चेअरमन कैलास तांबे, सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, मुकूंदराव सदाफळ, भाजयुमोचे योगेश गोंदकर, किरण बोराडे, अध्यक्ष सचिन शिंदे, श्रीराम गणपुले, जालिंदर वाकचौरे, मारुती बिंगले, अमोल खताळ, रघूनाथ बोठे आदी उपस्थित होते. या अधिवेशनात पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला.

आपल्या भाषणात सौ.विजया राहाटकर म्हणाल्या की, लोकसभा निवडणुकीत देशवासियांनी मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान पदावर बसविण्यासाठी समर्थन दिले. ही किमया फक्त प्रधानमंत्र्यांनी सुरू केलेल्या योजनांची होती. काँग्रेस सरकारच्या काळात फक्त घोषणा होत्या. मोदींच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून प्रधानसेवक म्हणून सेवा केल्याचे राहाटकर यांनी सांगितले.

लोकसभा निवडणूकीत वाईट शक्ती एकत्रित आल्या. सरकारच्या विरोधात खोटा अपप्रचार करुन, दिशाभूल करण्याचे काम जाणीवपुर्वक त्यांनी केले. मात्र संविधानामध्ये बदल करण्याचे आणि सोईनुसार त्याचा वापर करुन, अनेक राज्यांची सरकार बरखास्त करण्याचे काम याच काँग्रेस पक्षाने केले. याचा सोयीस्कर विसर राहुल गांधी यांना पडला. संविधानाचा सर्वाधिक अपमान काँग्रेस सरकारच्या कार्यकाळात झाला. या उलट संविधानाचा सन्मान करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात झाला असल्याचे रहाटकर म्हणाल्या.

केंद्र सरकारने अनुसुचित जाती, जमाती, मागासवर्गीय आणि ओबीसींचे हक्क आबादीत ठेवण्याचे काम केले. त्यासाठी मोठे काम केले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी केलेल्या निर्णयामुळे त्यांनाही सर्व संधी मिळाल्या. परंतू केवळ सरकारच्या विरोधात खोट्या अफवा पसरवून विरोधकांनी अपप्रचार केला असला तरी देशातील जनतेने कुठेही भारतीय जनता पक्षाला नाकारलेले नाही, हे मतांच्या टक्केवारी वरुन दिसून येते याकडे त्यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे लक्ष वेधले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे, सरचिटणीस नितीन दिनकर, सरचिटणीस नितीन कापसे यांचीही भाषणे झाली. या आधिवेशनास उत्तर नगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे पदाधिकारी, युवक आणि महिला कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाचकांच्या लेखणीतून

### लाईक्स आणि डिस्लाईक्स

हल्लीच्या युगात समाज माध्यमांचा जनजीवनावर फारच प्रभाव पडत आणि वाढत असल्याचे दिसते. फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर, व्हाट्सॲप ही समाजमाध्यमे बहुतेकांच्या परिचयाची झालेली आहेत. लाईक्स आणि डिसलाईक्सचा मुद्दा त्यात गृहित धरलेला असतो. आपण पाठविलेल्या मेसेजला किती लाईक्स मिळतात. ज्याने आपल्या मेसेजला लाईक केले त्याच्या मेसेजला आपणही लाईक केलेच पाहिजे. अन्यथा त्याच्याकडून मला लाईक्स येणे बंद होईल! तू मला चांगले म्हण; मी तुला चांगले म्हणतो! संस्कृत भाषेत अहो रूपं अहो ध्वनि: असा एक न्याय आहे. मूळ संस्कृत श्लोक असा आहे:



**उष्ट्राणां विवाहेषु गीतं गायन्ति गर्दभा:।**
**परस्परं प्रशंसन्ति अहो रूपं अहो ध्वनि:।।**

उंटाचे लग्न होते. (मित्र परिवारातील) गाढवांनाही या लग्नाचे आमंत्रण होते. लग्नात ऊंट गाढवांची आणि गाढवे उंटाची प्रशंसा करू लागली. हेंगाड्या उंटाला उद्देशून गाढवे म्हणाली, किती सुंदर तुझे रूप! अहाहा! अहाहा!! उंटही गाढवांच्या व्हांव व्हांव अशा रेकणाऱ्या गायनाला उद्देशून म्हणाला, काय तुमचा मधुर गळा! अहाहा! अहाहा!! असा हा आतबट्ट्याचा व्यवहार असतो. लाईक वा डिसलाईकचा मुद्दा थोडा वेळ बाजूला ठेवू. या मेसेजमध्ये निर्मितिक्षमता () किती? मेसेज पाठविणारा आणि मेसेज रिसीव्ह करणारा या दोघांची लायकी कोणी जोखली आहे का? हा कळीचा मुद्दा आहे! याचा आपण विचार करायला नको का?

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# ५ कोटींची ऑफर देणाराची चौकशी होणार

## मनसेचे आंदोलन आश्वासनानंतर मागे

**नगर : प्रतिनिधी**

**नगर पोलीस दलातील स्थानिक गुन्हे शाखेतील हप्तेखोरी विरोधात खा. नीलेश लंके यांनी आंदोलन करू नये यासाठी पाच कोटींची ऑफर देणाऱ्या व्यक्तीची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आश्वासन नगर पोलीसांकडून देण्यात आल्यानंतर मनसेचे नेते अविनाश पवार यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर सुरू करण्यात आलेले ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.**




५ कोटींची ऑफर दिल्याच्या आरोपामुळे महाराष्ट्र पोलीसांची बदनामी झाली असून सर्व सामान्य जनतेचा पोलीस प्रशासनावर असेल्या विश्वासास तडा गेल्याचे पवार यांचे म्हणणे होते. या आरोपातून जनतेमध्ये चुकीचा संदेश जाऊन संभ्रम निर्माण झाला आहे तो संभ्रम दुर करण्यासाठी तसेच पोलीस दलाची प्रतिमा, विश्वासार्हता अबाधित ठेवण्यासाठी, चांगले काम करणारे अधिकारी, कर्मचारी यांचे मनोबल वाढविण्यासाठी मनसेच्या वतीने ठियया आंदोलन पुकारण्यात आले होते.

मंगळवारी रात्री भिंगार पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक राजगुरू यांनी आंदोलकांशी चर्चा करून पोलीस प्रशासनावर झालेल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्यात आली असून चौकशी अहवालात दोषी आढळलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी नितिन म्हस्के, मारूती रोहोकले, दत्ता पवार, बाळासाहेब पवार, मंगेश शिंदे, भालचंद्र आनंदकर, अक्षय सुर्यवंशी, ज्ञानेश्वर गिरी, दत्ता पडवळकर यांच्यासह मनसे कार्यकर्ते उपस्थित होते.

# विधानसभेसाठी १२ मतदारसंघांची प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध

## नागरिकांनी आपल्या नावाची खात्री करावी- जिल्हाधिकारी

**नगर : प्रतिनिधी**



**आगामी विधानसभा निवडणुकीची प्रशासकीय तयारी सुरू झाली आहे. नगर जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघातील प्रारूप मतदार याद्या मंगळवारी प्रसिद्ध झाल्या. नागरिकांनी आपल्या नावाची मतदार यादीत खात्री करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मंगळवारी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात द्वितीय विशेष संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी व मतदान केंद्राच्या याद्यांच्या प्रसिद्धीबाबत सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शाहू मोरे, तहसीलदार प्रदीप पाटील यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सालीमठ म्हणाले,भारत निवडणूक आयोगाने १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्र मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रम जाहीर केल्यानुसार जिल्हयातील १२ विधानसभा मतदार संघाच्या मतदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय तसेच संबंधित मतदान केंद्रावर एकत्रीकृत प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केली आहे. नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत आहे किंवा नाही याची खात्री करावी.

नागरिकांना नमुना ६,७, ८ भरण्याची सुविधा भारत निवडणूक आयोगाच्या https://voters.eci.g ov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच मतदार यादीत आपले नाव तपासण्यासाठीwww.ceo.maharashtra.gov.in आणि www.electoralsearch. eci.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. व्होटर्स हेल्पलाइन मोबाईल ॲपवरही नाव नोंदणी व नाव शोधण्यासाठी उपलब्ध आहे.

३० ऑगस्टला अंतिम मतदार यादी भारत निवडणूक आयोग जाहीर केलेल्या छायाचित्र मतदार याद्यांच्या संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रमानुसार ६ ऑगस्ट ला एकत्रिकृत प्रारुप मतदार याद्यांची प्रसिद्धी करणे, ६ ते २० ऑगस्ट दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी, १०, ११, १७ व १८ ऑगस्ट ला प्रत्येक मतदान केंद्रावर विशेष मोहिमांच्या आयोजनाचा कालावधी आहे. २९ ऑगस्टला दावे व हरकती निकाली काढण्यात येणार आहेत. २९ ऑगस्टला अंतिम प्रसिद्धीसाठी आयोगाची परवानगी मागणे तसेच डाटाबेस अद्ययावत करणे आणि पुरवणी याद्यांची छपाई करण्यात येणार आहे. ३० ऑगस्टला अंतिम यादीची प्रसिद्धी करण्यात येणार आहे.असे सालीमठ यांनी सांगितले.

(पान १ वरुन)

### अस्तगांवच्या सरपंचांविरूध्द अविश्वास ठराव मंजूर

अस्तगांव ग्रामपंचायतीच्या पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये अविश्वास ठराव दाखल करणारे तसेच सरपंच लताबाई काळे यांनी एकत्रित निवडणूक लढवित विजय संपादन केला होता. त्यानंतर सर्वानुमते लताबाई काळे यांचे सरपंचपदी निवड करण्यात आली होती. ग्रामपंचायतीचा कारभार सुरू झाल्यानंतर मात्र सरपंच काळे यांनी सदस्यांना विश्वासात न घेता मनमानी कारभार सुरू केला. काळे यांना विनंती करूनही त्यांचा कारभार मनमानी पध्दतीने सुरूच राहिल्याने नऊ पैकी सात सदस्यांनी एकत्र येत त्यांच्यावर अविश्वास ठराव दाखल केला. तो सात विरूध्द शुन्य मतांनी मंजूर झाला.

### वाडेगव्हाणच्या तुकाई मंदिरात चोरी करणारा अट्टल चोरटा जेरबंद !

समांतर तपास करूनही गुन्हेगाराचा शोध लागला नव्हता त्यासाठी श्वान पथकाचीही ही मदत घेण्यात आली होती मात्र आरोपी शोधण्यास पोलिसांना अपयश आले होते.

या आरोपीने तुकाई देवीच्या मंदिरासह आणखी दहा मंदिरांमध्ये डल्ला मारत लाखों रुपयांचे दागिने, देवतांच्या मूर्ती आणि सोन्या चांदीचे मुखवटे लंपास केल्याचे उघडकीस आले आहे. पुणे ग्रामीण पोलिसांच्या पारगाव (कारखाना) पोलिसांनी ही कारवाई केली असून आरोपींकडून चार लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. या टोळीने पुणे आणि नगर जिल्ह्यातील थोड्याथोडक्या नव्हे तर ११ मंदिरांमध्ये चोरी केल्याची माहिती पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिली.

हा आरोपी सराईत गुन्हेगार असल्याची खात्री पारगाव (कारखाना) पोलिसांनी पटवली. तो शिकापुर येथे येणार असल्याची माहिती खबऱ्या मार्फत पोलिसांना मिळाली होती. त्याला सापळा रचून शिताफिने शिक्रापूर येथून ताब्यात घेण्यात आले. या मंदिर चोरीबाबत विचारपूस केली असता त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर, पोलिसांनी त्याला 'खाक्या' दाखवला. त्यानंतर त्याने मंदिर चोरीची कबुली दिली. त्याला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली.

त्याच्याकडे चौकशी सुरू असता त्याने शिक्रापूर येथील राऊतवाडीमध्ये असलेले श्रीनाथ मस्कोबा मंदीर, कवटेमळा येथील वडजाई माता मंदिर, खेड राजगुरूनगर येथील कन्हेरसर येमाई जुने ठाणे मंदिर, शिरूर सविंदणे येथील काळूबाई मंदीर, रांजणगाव फंडवस्ती येथील तुकाई माता देवीचे मंदिर, घोडेगाव शिंदेवाडी येथील खंडोबा मंदीर व कळमजाई मंदीर, तसेच अहमदनगर जिल्हयातील सुपा येथील तुकाई मंदीर वाडेगव्हाण पारनेर व नगर एमआयडीसी येथील श्री खंडोबा मंदिर, शिव मल्हारगड, पिंपळगाव माळी इत्यादी ठिकाणी रात्रीच्या वेळी चोऱ्या केल्याची कबुली दिली. या सर्व गुन्ह्यांच्या अनुषंगाने पोलिसांनी तपास आणि चोरीला गेलेला मुद्देमाल जप्त करण्याची कारवाई सुरू करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.






# पारनेर पब्लिकमध्ये मुख्यमंत्री सुंदर शाळा उपक्रमास प्रारंभ

## वृक्षारोपण करून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश




■ मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याचा वृक्षारोपण करून शुभारंभ करण्यात आला.

**पहिल्या टप्प्यात पहिला क्रमांक!**

**मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्र.१ या कार्यक्रमात मागील वर्षी पारनेर पब्लिक स्कुल या विद्यालयाने तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले असून यंदा पुन्हा या स्पर्धेत सहभाग नोंदवून पारनेर तालुक्याचे जिल्हा, विभाग व राज्य पातळीवर नाव घेऊन जाण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांनी कंबर कसली आहे.**

**गिताराम म्हस्के**
**प्राचार्य**

**पारनेर : प्रतिनिधी**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अनोख्या स्पर्धात्मक अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यास पारनेर शहरातील पारनेर पब्लिक स्कुलमध्ये उत्साहात प्रारंभ करण्यात आला. वृक्षारोपण करण्यात येऊन यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. प्राचार्य गिताराम म्हस्के यांच्या हस्ते सोमवार दि. ५ ऑगस्ट रोजी वृक्षारोपण करून अभियान सुरू करण्यात आले.**

यावेळी बोलताना प्राचार्य गिताराम म्हस्के म्हणाले, पर्यावरण समृध्द करण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. पर्यावरणाचा समतोल ढासळल्याने अनेक नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागत असून तापमानात होणारी वाढ, अतिवृष्टी, दुष्काळ आदी संकटे वारंवार येत आहेत. जंगले नष्ट होऊ लागल्याने अनेक सजीवांच्या प्रजाती नष्ट होत आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण हा एकमेव पर्याय असून प्रत्येकाने आपली जबाबदार पार पाडण्याचे आवाहन म्हस्के यांनी केले. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावणाऱ्या विविध कार्यक्रमांचे अनुकरण करून आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास साधण्याचे आवाहन म्हस्के यांनी केले.

या अभियानाच्या शुभारंभाप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, दिपक जाधव, महेश जाधव, दत्तात्रेय काकडे, ऋषीकेश खोडदे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# शैक्षणिक संस्कृतीला चालना दिल्याने निघोज परिसराचा विकास - अध्यक्ष वसंत कवाद

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज आणि परिसरात शैक्षणिक संस्कृतीला गेली पंधरा ते वीस वर्षात मोठ्या प्रमाणात चालना मिळाली असल्याचे स्पर्धा परीक्षांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात संधी मिळाल्याने उच्चशिक्षीतांना राज्य व केंद्र सरकारच्या सेवेत उच्च अधिकारी पदावर काम करण्याची संधी मिळाल्याने गावचा नावलौकिक वाढला व खऱ्या अर्थाने गावच्या विकासाच्या योजना सर्वांच्या मार्गदर्शनाने राबविण्यात आल्याने शैक्षणिक संस्कृती किती महत्वाची आहे हे समजले असे प्रतिपादन बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद यांनी व्यक्त केले आहे.**



पतसंस्थेच्या वतीने निघोज येथील अमोल कैलास शिंदे , सचिन नाथा ढवण यांची महाराष्ट्र राज्य सेवा आयोगामार्फत एम.पी.एस.सी परिक्षेत यश संपादन करून महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा पुणे विभागात (कालवा निरीक्षक ) पदी निवड झाल्याबद्दल व अक्षय पांडुरंग भांबरे यांची इंडियन आर्मी मध्ये फार्मसिस्टपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद, उपाध्यक्ष नामदेवराव थोरात व संचालक मंडळ यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी ते बोलत होते.


याप्रसंगी शांताराम कळसकर, ठकाराम लंके , चंद्रकांत लामखडे, भिवा रसाळ ,बाबाजी कळसकर , अमृताशेठ रसाळ, दत्तात्रय लंके, संपतराव ठुबे, शांताराम सुरकुंडे , सुनील तांबे, रायचंद गुंड , भाऊ रसाळ , कैलास शिंदे आदी मान्यवर तसेच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पतसंस्थेचे अध्यक्ष कवाद यावेळी म्हणाले पारनेर तालुका हा गुणवंताचा तालुका म्हणून राज्यात नावलौकिक मिळविलेला तालुका आहे. खासदार नीलेश लंके यांनी तालुक्यात अनेक गावात स्पर्धा परीक्षा अभ्यास करण्यासाठी अभ्यासिका इमारती राज्य सरकार माध्यमातून उभ्या केल्या आहेत. निघोज येथील शरदचंद्रजी पवार अभ्यासिका अद्ययावत आहे या ठिकाणी स्पर्धा परीक्षा अभ्यास करण्यासाठी या भागातील विद्यार्थ्यांना मोठी संधी उपलब्ध असून याचा लाभ घेण्याचे आवाहन कवाद यांनी केले आहे.

शांताराम कळसकर यावेळी म्हणाले गेली पाच वर्षात खासदार नीलेश लंके यांनी तालुका शैक्षणिक दृष्टीने कार्यक्षम होण्यासाठी राज्य सरकार माध्यमातून आलेल्या शैक्षणिक योजनांची मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी करीत तालुक्याचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहेत. खासदार म्हणून काम करताना लंके हे केंद्र सरकारच्या योजना अधिक कार्यक्षमतेने राबवून नगर जिल्हा सक्षम करतील अशी खात्री कळसकर यांनी व्यक्त केली आहे. शांताराम सुरकुंडे यांनी सूत्रसंचालन तर दत्तात्रय लंके यांनी आभार मानले.

# भोयरे गांगर्डात भरवस्तीत बिबट्याचे दर्शन!

## ■ ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण ■ वनविभागाने पिंजरा लावण्याची मागणी



**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील भोयरे गांगर्डा येथे मंगळवार दि.६ रोजी रात्री ९.२० वाजता व बुधवार दि.७ रोजी पहाटे ६ वाजता भरवस्तीत बिबट्याचे दर्शन झाल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाच्या वतीने तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे अशी मागणी ग्रामस्थांमधून केली जात आहे.**

चोहीबाजुने डोंगर असलेल्या भोयरे गांगर्डा गावात यापूर्वी डोंगरानजीक अनेक वेळा बिबट्याचे दर्शन ग्रामस्थांना झाले मात्र यावेळी रसाळवाडी नजीक असलेल्या प्रभात डेअरीजवळ बिबट्याने दर्शन दिले असून हा बिबट्या थेट वस्तीत घुसल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.

चालू वर्षी पाऊस समाधानकारक झाल्यामुळे शेतात कांदा, मुग, बाजरी, मका, कडवळ, गवत आदी पिके जोमाने वाढली आहे. सारोळा सोमवंशी रस्त्यावर वस्ती परीसरात बाजरी, उंच वाढलेले गवत असल्याने बिबट्यास दडायला जागा मिळाली असून चक्क वस्तीजवळ बिबट्याचे दर्शन झाल्याने ग्रामस्थांनी रात्र जागून काढली.

दरम्यान ग्रामीण भागात दिवसेंदिवस बिबट्याचे दर्शन होत असून मध्यंतरी पाडळी रांजणगाव मध्ये घराच्या पडवीत झोपलेल्या कामगारावर बिबट्याने जिवघेणा हल्ला केला. यात तो कामगार गंभीर जखमी झाला होता. सध्या पावसाने उघडीप दिली असून शेतकरी कांदा, मका, घास, कडवळ, गवत, कांदा रोप आदी पिकांना पाणी देण्याचे काम सुरू आहे. दिवस व रात्र विद्युत पुरवठा केला जात असल्याने पिकास पाणी कसे द्यावे या विवंचनेत शेतकरी सापडला आहे. वनविभागाने तातडीने पिंजरा लावावा अशी मागणी ग्रामस्थांमधून केली जात आहे.

# प्रा.आनंद पाटेकर सेट परीक्षा उत्तीर्ण

## पाटेकर मुलिकादेवी विद्यालयात सहाय्यक प्राध्यापक

**निघोज : प्रतिनिधी**

**आनंद सुरेश पाटेकर हे इंग्रजी विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ७ एप्रिल २०२४ रोजी घेतलेल्या सहायक प्राध्यापक पात्रता परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यात आनंद पाटेकर यांनी सेट परीक्षा उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे.**



प्राध्यापक आनंद पाटेकर हे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री मुलिकादेवी महाविद्यालय निघोज येथे इंग्रजी विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे संलग्नित न्यू आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज अहमदनगर येथे डॉ.जयश्री आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी काम सुरू आहे.

मुलिकादेवी महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वय म्हणून काम पाहतात. प्राध्यापक पाटेकर हे पंचायत समिती येवला येथील गट विकास अधिकारी सुरेश पाटेकर यांचे चिरंजीव आहेत.त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. सहदेव आहेर, प्राचार्य डॉ बाळासाहेब सागडे, प्राचार्य डॉ, लक्ष्मण मतकर, प्राचार्य डॉ रंगनाथ आहेर, डॉ भाकर घोडके, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, आजी -माजी विद्यार्थी, तसेच सर्व स्तरांतून त्यांचा यशाबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

# ज्ञानाचा योग्य वापर हाच सदाचार!

## ■ डॉ. अमित पुरोहित यांचे प्रतिपादन ■ पारनेर पब्लिक स्कुलमध्ये अध्यात्माचे धडे



**पारनेर : प्रतिनिधी**

**आपण घेतलेल्या ज्ञानाचा व्यवहारात योग्य उपयोग करणे हाच सदाचार असून चांगले विचार केले तर चांगले कार्य आपल्या हातून घडते, वाईट विचार केला तर कार्य वाईट घडत असल्याने चांगला विचार करण्याचे आवाहन डॉ. अमित पुरोहित यांनी केले.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानांतर्गत पारनेर पब्लिक स्कुलमध्ये पराविद्या इन्टिटयूटचे डॉ. अमित पुरोहित व सौरभ जाधव यांनी विद्यार्थ्यांना अध्यात्माचे धडे दिले.

डॉ. पुरोहित म्हणाले, शालेय विद्यार्थ्यांना जीवनातील अध्यात्माचा उद्देश स्पष्ट केल्यास ते चांगले शिकतील. अध्यात्माच्या मुल्यांचा समावेश करून विद्यार्थ्यांचे मन, शरीर आणि आत्म्याच्या सुदृढतेत, सक्षमतेत वाढ घडवून आणता येऊ शकते. त्यातून खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास होऊ शकेल.

पुरोहित म्हणाले, अध्यात्मिक साहित्यात अध्यात्मिक व्यक्तीशी सुसंगत असलेली पाच मुल्ये प्रकट होतात. त्यात अर्थ शोधणे, परोपकारी प्रेम, आत्मजागरूकता, दृष्टी आणि सत्यता यांचा समावेश होतो. काही मुल्ये विस्तृत आणि व्यापक रितीने कार्य करतात जे उपमुल्यांचा अभ्यास करण्यास परवानगी देतात. विश्वास, ध्यान, सकारात्मक विचार आणि नम्रता याचा त्यात समावेश होत असल्याचे पुरोहित यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे संस्थापक तथा प्राचार्य गिताराम म्हस्के, संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. दिपक जाधव यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले तर दत्तात्रेय काकडे यांनी आभार मानले.

# माझा विकासाचा अजेंडा ठरलेला ! - सुजित झावरे पाटील

**वासुंदे : प्रतिनिधी**

**राजकारण करताना प्रत्येक नेत्याचा अजेंडा ठरलेला असतो, निवडणुकांमध्ये त्या अजेंड्यावर तो सामोरे जातो. मी राजकारण करत असताना माझा विकासाचा अजेंडा ठरलेला आहे त्या माध्यमातून तालुक्यात विकासात्मक राजकारण करत आहे तालुक्यात निव्वळ राजकारण न करता विकास कामांच्या बाबतीत स्पर्धा करा राजकारण करत असताना विकास कामा करणे हे मी माझे प्रथम कर्तव्य समजतो असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे यांनी केले.**



वासुंदे येथील वासुंदे ते चेमटेवस्ती रस्ता टाकळी ढोकेश्वर मार्गे शेत पाणंद रस्ताचे भूमिपूजन समारंभ सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुरेश पठारे, अरुण ठाणगे, सतिष पिंपरकर, भाऊसाहेब सैद, चेअरमन नारायण झावरे, दिलीप पाटोळे, लहानु झावरे, लक्ष्मण झावरे, बाळासाहेब शिंदे, स्वप्निल झावरे, विलास साठे, अमोल शिंदे, दत्तात्रय बर्वे, अंकुश बर्वे, विकास झावरे, राजेश साठे, निलेश भालके, अशोक चेमटे, कैलास चेमटे, माऊली चेमटे, तुषार चेमटे, शुभम चेमटे, आदित्य राऊत, योगेश चेमटे, दिपक चेमटे, विशाल चेमटे, अशोक चेमटे, काशिनाथ चेमटे, बाळासाहेब झावरे, तुकाराम चेमटे, भास्कर चेमटे, पोपट चेमटे, रामभाऊ चेमटे, अरुण चेमटे, विशाल चेमटे, निलेश भालके, सोपान राऊत, सोपान राऊत, सोमनाथ राऊत, अजिक्य खिलारी, शंकर झावरे, गणेश झावरे, प्रसाद झावरे, महादू दाते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# गणेश आठरे यांना सारथी संस्थेच्या वतीने यांना पारितोषिक

## राज्यात प्रथम आल्याबद्दल सन्मानित

**सुपा : प्रतिनिधी**

**छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानवी विकास संस्था सारथी पुणे यांचे मार्फत विद्यार्थ्यांना मोफत कम्प्युटर डिप्लोमा कोर्स दिला जातो, या कोर्सच्या माध्यमातून स्पोकन इंग्लिश, आयटी, टॅली, अ‍ॅडव्हान्स एक्सल, तसेच इतर जॉब मिळवून देणारे कोर्स विद्यार्थ्यांना सारथी च्या मार्फत मोफत शिकवले जातात.**




याही वर्षी विद्यार्थ्यांना हा कोर्स करता येणार आहे असे अशोक काकडे आय ए एम मॅनेजर डायरेक्टर सारथी यांनी सांगितले.सरसेनापती वीर बाजी पासलकर संगणक शिकता शिकता कमवा या योजनेअंतर्गत सारथी या योजनेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

यावेळी महाराष्ट्रातून सारथीचे सर्वात जास्त ऍडमिशन अहमदनगर जिल्ह्यातून झाल्याबद्दल अहमदनगर एलएलसीचे प्रमुख गणेश आठरे यांचा प्रथम पारितोषक देऊन सारथीचे चेअरमन अजित निंबाळकर यांनी सन्मान केला. या वेळी विवेक सावंत, अशोक काकडे, श्रीमती विना कामत, श्री नवनाथ पासलकर, माजी सचिव महाराष्ट्र राज्य, संजू जाधव, माजी सचिव महाराष्ट्र राज्य आदी उपस्थित होते. यावेळी भाऊसाहेब आठरे, चक्रधर करे, संगीत थोरात, शशिकांत गलबले, परवेज शेख यांचा देखील सन्मान करण्यात आला.

# पळवे खुर्द येथील अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ; यंदा सप्ताहाची द्वितपपुर्ती



**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**पळवे खुर्द येथे सालाबाद प्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून यंदा द्वितपपुर्ती साजरी करणाऱ्या या सप्ताहास सोमवार दि.५ ऑगस्ट रोजी प्रारंभ झाला. मंगळवार दि.१३ ऑगस्ट रोजी काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.**

सोमवार दि.५ रोजी चंद्रकांत महाराज रासकर,वाघुंडे, मंगळवार दि.६ ऑगस्ट रोजी प्रा. अशोक महाराज शिंदे डिकसळ तर बुधवार दि.७ ऑगस्ट रोजी मोहन महाराज आळंदीकर यांची किर्तन सेवा पार पडली.

गुरूवार दि. ८ ऑगस्ट रोजी देवदैठण येथील वाणीभुषण संतोष महाराज कौठाळे, शुक्रवार दि.९ ऑगस्ट रोजी पळवे खुर्द येथील सोमनाथ महाराज बारगळ, शनिवार दि.१० ऑगस्ट रोजी शिरूर येथील अरूण महाराज उंबरेकर, रविवार दि. ११ ऑगस्ट रोजी जुन्नर येथील अशोक महाराज शिंदे, सोमवार दि.१२ रोजी रांजणगांव मशिद येथील गोरख महाराज बनकर यांच्या किर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार दि.१३ ऑगस्ट रोजी दौंड येथील गायनाचार्य ह.भ.प.श्यामसुंदर महाराज ढवळे यांचे सकाळी ९ ते ११ दरम्यान काल्याचे किर्तन होणार आहे. काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी भगवान तबाजी जारकड, शंकर बाळाजी जारकड, शिवाजी कोंडीबा गाडीलकर यांचे सौजन्य लाभले आहे. सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन पळवे खुर्द ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रसिद्ध साहित्यिक संजय कळमकर यांना पितृशोक

## आदर्श शिक्षक विठ्ठलराव कळमकर यांचे निधन

**नगर : प्रतिनिधी**

**प्रसिद्ध साहित्यिक, व्याख्याते व शिक्षक नेते डॉ. संजय कळमकर यांचे वडिल आदर्श शिक्षक विठ्ठलराव कळमकर यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात १ मुलगी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.**



अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत स्व. विठ्ठलराव कळमकर यांनी शिक्षण घेतले. पुढे शिक्षक म्हणून नोकरी करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले. ते अत्यंत शांत स्वभावाचे विद्यार्थीप्रिय शिक्षक होते. नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील या त्यांच्या मूळ गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, प्रशासकीय, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले, अशी जुनी - जाणती माणसं गेल्याने फक्त कुटूंबाचे नाही तर समाजाचेही मोठे नुकसान होते. डॉ. संजय कळमकर यांच्या रुपाने गुरुजींनी महाराष्ट्राच्या साहित्याक्षेत्राला मोठी देणगीच दिली आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com